# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी :-** sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/संघीय संस्था निव./२०१४ /1151
दिनांक २२ /१२ /२०१४

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था (सर्व).

**विषय : संघीय सहकारी संस्थांच्या निवडणुकाबाबत..**

उपरोक्त संदर्भांकीत विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येऊन कळविणेत येते की,

२/- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब मधील तरतुदीनुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणावर सोपविलेली असुन शासन अधिसुचना दि.३०/३/२०१३ अन्वये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण गठीत झालेले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) नुसार सहकारी संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका, संस्थेच्या समितीच्या सदस्यांच्या रिकृत पदांची व पदाधिकारी यांची निवडणुक राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने घ्यावयाची आहे. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ हे निवडणुक नियम अमलात आलेले आहेत.

राज्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या निवडणुकासंदर्भाने त्यांच्या सभासद संस्थांच्या निवडणुका या जिल्हा बँकांच्या निवडणुकीपूर्वी घेणे अभिप्रेत आहे. ज्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची समितीची मुदत संपली आहे, त्या बँकांची निवडणुक प्रक्रिया सुरु करणेपूर्वी त्यांच्या सभासद संस्थांच्या निवडणूका प्राधिकरणामार्फत सुरु आहेत. तथापी, सभासद असलेल्या सहकारी संस्था त्यांची मुदत संपुनही निवडणुक घेणेबाबत सहकार्य करत नाही, तसेच ई-२ नमुना भरुन न देणे, ई-१ नमुन्यातील माहिती न देणे, ई-३ नमुन्यामध्ये प्राथमिक मतदार यादी जाणूनबुजून न सादर करणे, निवडणुक निधीची रक्कम भरण्यास टाळाटाळ करणे इ. बाबींमुळे निवडणूक घेण्यास कसूर करत असतील तर संबंधीत निबंधकाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३(आय) चे तरतुदीनुसार कार्यवाही करणे अपेक्षित ठरेल जेणेकरुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूका मुदतीत पार पाडणे सुकर होईल.

संबंधीत निबंधकाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या सभासद सहकारी संस्थांची यादी घेऊन ज्या सभासद सहकारी संस्थांची मुदत संपली आहे अशा सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची सुरु होणेपूर्वी पूर्ण करावी किंवा आवश्यक तेथे कलम ७३ (आय) प्रमाणे उचित कार्यवाही करावी.

**मात्र कोणत्याही परिस्थितीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभासद संस्थांची निवडणूक प्रक्रिया (सभासद संस्था ही 'ब' वर्गातील असो किंवा 'क' वर्गातील असो) विनाविलंब सुरु करण्याची कार्यवाही जिल्हा/ तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी करावी.**

मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पूणे यांचे मान्यतेने.

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.